**Review Of Research**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# १९९० नंतरची महानगरीय कादंबरी

**प्रा. डॉ. आनंदा गांगुर्डे**
विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती.

**गोषवारा**
साठोत्तर काळात उगम पावलेला महानगरीय कादंबरीचा प्रवाह नंतरच्या काळात विस्तारत गेला. स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई महानगरात निर्माण झालेल्या प्रक्षुब्ध वातावरणात महानगरीय कादंबरीची बीजे सापडतात. वाढते औद्योगिकरण आणि यांत्रिकीकरण यामुळे मुंबई महानगराचा विकास झाला. हमखास रोजगाराची उपलब्धी अणि ग्रामीण महाराष्ट्रातील दुष्काळ, बेरोजगारी यामुळे कंटाळून खेडया—पाडयातील माणसांचे मुंबई महानगरात स्थलांतर झाले. परिणामी या गर्दीचा विपरीत परिणाम महानगरातल्या नागरी सुविधांवर झाला. निवासाच्या गैरसोयींमुळे झोपडपट्टयांची बेफाम वाढ झाली. अशा सर्व घटनांचे पडसाद मराठीत महानगरीय कादंबरीत उमटलेले दिसतात. महानगरीय जीवनाचे काही महत्त्वाचे घटक सांगावयाचे झाल्यास औद्योगिकरण, यांत्रिकीकरण, असुरक्षितता आणि अनिश्चितता, व्यावसायिकता, आधुनिकता, गर्दी आणि वेग, व्यक्तिवादी दृष्टिकोन, गर्दीत हरवलेला चेहरा, जगण्यातले ताण—तणाव, दुभंगलेपण, पाश्चात्य प्रभाव, परात्मता आणि व्यामिश्रता, आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण,



मुकत बाजारपेठ, वाढता उपभोक्तावाद, बकालपणा, मूल्यशून्यता, दहशतवाद, हिंसाचार, अलिप्तता इ. महानगरीय घटकांना केंद्रवर्ती मानुन महानगरीय कादंबरीचे लेखन झाले. वरील घटकांचा प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष परिणाम महानगरीय जीवनशैलीवर होऊ लागला. ही महानगराची व्यामिश्र जीवनशैली कादंबरीत उमटू लागली. थोडक्यात महानगरीय जीवन जाणिवांचे स्पष्ट प्रतिबिंब ज्या कादंबरीत पडलेले असते त्या कादंबरीला महानगरीय कादंबरी असे म्हणता येईल.

**की वर्डस :** महानगरीय, बकालपणा, जागतिकीकरण.

१९९० नंतर एकूणच जागतिक वाङ्मयाचे संदर्भ बदलले. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचे वारे वाहू लागले. राष्ट्रा—राष्ट्रामधील सीमारेषा पुसट झाल्या. औद्योगिकरणाचा झपाटयाने विकास झाला. भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे पदार्पण झाले. नवी भांडवलशाही प्रवृत्ती जन्मास आली. मुंबई ही तर भारताची आर्थिक राजधानी. 'ग्लोबलायझेशन' चे परिणाम मुंबईत दिसू लागले. गिरगावातील गिरण्यांना अखेरची घरघर लागली. गिरगाव, लालबाग परळ आदी उपनगरातील कामगार रस्त्यावर आला. माणसांची भयानक गर्दी वाढली. स्पर्धा, मूल्यशून्यता, बकालपणा, बेरोजगारी, धावपळ, एकांगीपणा, जागेचा प्रश्न, वाढता दहशतवाद यामुळे मुंबई महानगरातील माणसाचे जगणे असुरक्षित झाले. महानगरीय जीवनशैली गुंतागुंतीची झाली. या व अशा आभासी जीवनाला कवटाळणारी 'उत्तर—आधुनिकतावाद' ही नवी संज्ञा मराठी साहित्यात रुढ झाली. महानगरीय कादंबरीकारांनी हे महानगरीय वास्तव कादंबरीत पकडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सामाजिक वास्तवाचा सर्जनशील दस्तऐवज म्हणजे कादंबरी असे मानले जाते. अजस्त्र महानगरीय वास्तव हे आव्हान श्री. भाऊ पाध्ये यांच्या व्यतिरिक्त त्यानंतर कुणालाही पेलवता आले नाही. तरीही अरुण साधू, ह. मो. मराठे, शांता गोखले, सुभाष भेण्डे, रंगनाथ पठारे, श्याम मनोहर, शंकर सखाराम, गौरी देशपांडे, संजीव खांडेकर, संजय जोशी आदी कादंबरीकारांनी महानगरीय वास्तव पकडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. परंतु भाऊ माध्ये वगळता समग्र महानगरीय वास्तव कुणालाही पकडता आले नाही. मुंबई महानगरात मराठी माणूस कोणत्याचा क्षेत्रात अग्रेसर नाही. याविषयी अविनाश सप्रे म्हणतात, ''महाराष्ट्रात मुंबई आहे; पण मुंबईत महाराष्ट्र पसही असे म्हणतात. हे जे मुंबई नावाचे महानगर आहे, त्याच्या आताच्या जडणघडणीत मराठी माणूस पुढे नाही म्हणून मराठी साहित्यातही मुंबई पुढे नाही असे म्हणता येईल का? आणखी एक, महाराष्ट्राच्या संदर्भात मुंबई हे औद्योगिकतेचे केंद्र आणि पुणे हे सांस्कृतिक केंद्र अशी जी फारकत झाली आहे, असे जे दुभंगलेपण आहे (जे कोलकात्याच्या

बाबतीत नाही आणि म्हणून बंगाली साहित्यातल्या महानगरीय जाणिवांतही नाही) त्याचा दुष्परिणाम महानगरीय जाणिवांचा प्रभावी आविष्कार मराठी साहित्यात न होण्यात झाला असावा असे वाटते. मुंबई महानगराने निर्माण केलेल्या 'अभिजनवर्गात' (ज्यात साहित्यिकही येतात) मराठी माणूस, नगण्य असावा ही आपल्याला लाज वाटावी अशी बाब आहे.''[१] मुंबई महानगरातल्या प्रत्येक क्षेत्रात घसरलेला मराठी टक्का पाहिल्यानंतर अविनाश सप्रे यांची खंत रास्त वाटते.

१९९० नंतर जागतिकीकरण—खाजगीकरण—उदारीकरण यामुळे संपूर्ण जगातच मूल्यऱ्हास झाला. नैतिकता खुंटीला अडकवून आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचं भ्रष्ट अनुकरण सुरु झालं. मूल्यशिक्षणाचे धडे देणाऱ्या साहित्यक्षेताही मूल्यभ्रष्टता दिसू लागली. वसंत नरहरी फेणे यांच्या 'ऱ्हासपर्व' (१९८६) या कदांबरीत किडलेल्या साहित्यिक संस्कृतीची अशीच बाजू मांडली जाते. कलावंतपणाच्या मुखवटयाखाली मूल्यभ्रष्ट होऊन जगणाऱ्या आत्मकेंद्रित लेखकाचे जगही महानगरातच असते. याचा प्रत्यय या कादंबरीतून येतो. नैतिकतेच्या गप्पा मारायच्या पण वास्तवात मात्र अनैतिक वर्तन करायचे असा दुटप्पीपणा साहित्यक्षेत्रातही असतोच असे दिसते. रुढ अर्थाने जिला महानगरीय कादंबरी म्हणता येणार नाही अशा आनंद यादव यांच्या 'कलेचे कातडे' या कादंबरीतही हा विषय आलेला आहे. 'किडलेली माणसे' ही गंगाधर गाडगीळांना मुंबईतील खुटमुटयांची चाळीत जशी दिसली तशी ती उच्च मध्यमवर्गातही आहेतच. अशी ही सार्वत्रिक मूल्यभ्रष्टता जागतिकीकरणानंतर समाजातील विविध स्तरांमध्ये प्रकर्षाने जाणवायला लागली. ह.मो. मराठे यांच्या 'सॉफ्टवेअर (१९८७) व 'मार्केट' (१९८८) या कादंबऱ्यातही महानगरीय जीवनातील व्यामिश्रतेचे दर्शन घडते. अरुण साधू यांच्या पाठोपाठ ह.मो. मराठे यांची महानगरीय जाणीव ही प्रगल्भ दिसते. त्यांची 'सॉफ्टवेअर' ही कादंबरी उद्योगव्यवसायात नवे व्यवस्थापन कौशल्य आणू पाहाणाऱ्या देशमुखांच्या भ्रमनिरासाची कथा आहे. व्यावसायिक नीतीमूल्य जपणाऱ्या त्यांच्यासारख्या संवेदनशील माणसाला पैसा व व्यवसायाला अवास्तव महत्त्व देणाऱ्या व्यावसायिक क्षेत्रात कुठलाच थारा नाही. नियमांच्या चौकटीत राहून काम केल्याबद्दल त्यांनाच निलंबित व्हावं लागतं. एकूणच काय तर सरळमार्गी माणसांना या महानगरात आता जागा नाही. भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवला म्हणून त्यांनाच तांत्रिक कारणांमुळे कायद्याच्या चौकटीत अडकण्यासारखा हा प्रकार आहे. 'मार्केट' (१९८८) मध्ये ह.मा. मराठे यांनी मानवी जीवनाचे बाजारुपण दाखविले आहे. पैसा आणि त्याने खरेदी करता येणारे भौतिक सुख हेच एकमेव साध्य मानणाऱ्या लोकांचे हे जग आहे. पैशाला अवास्तव महत्त्व दिल्यामुळे माणसांचही मार्केटींग होतं. भावनेपेक्षा व्यवहार श्रेष्ठ ठरतो. ह.मो. मराठे यांनी या कादंबरीच्या माध्यमातून भावनांचा गुंता व मूल्यांचा कोंडमारा दाखविला आहे.

अरुण साधू यांनी 'झिपऱ्या' (१९९०) या कादंबरीत महानगरीय उपेक्षित जीवनाचे म्हणजे चेंबुरच्या झोपडपट्टीतील नरक जीवनाचे दर्शन घडविले आहे. अरुण साधू हे महानगरीय जीवन वास्तवाला भिडणारे कादंबरीकार आहेत. या आधीच्या 'मुंबई दिनांक' (१९७३), 'सिंहासन' (१९७७) या कादंबऱ्यांमध्ये त्यांनी महानगरीय जीवन रेखटले आहे. 'झिपऱ्या' (१९९०) या कादंबरीत त्यांनी झिपऱ्या नावाच्या १०—१२ वर्षे वयाच्या रेल्वे स्टेशनवर बुटपॉलिश करणाऱ्या मुलाचे व त्याच्या सवंगडयाचे चित्रण केले आहे. झिपऱ्या, नाच्या, असलम, पोंब्या, दाम्या व गंजू हे लोकल गाडीत बुटपॉलिश करतात. परंतु प्रामाणिकपणे काम करणाऱ्या या मुलांच्या पैशांवर पिंगळयादादांसारखे गुंड कसा डल्ला मारतात. हे कादंबरीकाराला सांगायचे आहे. परंतु मुंबईच्या ज्या झोपडपट्टयांमध्ये महानगरपालिकेचा दिवा पोहोचत नाही तेथे हातात ज्ञानाची पणती घेऊन वावरणारे कीर्तनेमास्तरही या महानगरात आहेत, हे पाहून सुखद धक्का बसतो.

रंगनाथ पठारे यांची 'हारण' (१९९०), शांता गोखले यांची 'रीटा वेलीणकर' (१९९०) यासारख्या कादंबऱ्यांमध्ये महानगरीय जीवनशैली आली आहे. रीटा वेलणकर मध्ये शांता गोखले यांनी पुरुषी वर्चस्व झुगारुन देणारी रीटा रेखाटली आहे. लिंगभावाच्या पलिकडे विचार करणारी रीटा बंडखोर प्रवृत्तीची आहे. या कादंबरीतील कालावकाशाचा शोध घेतांना डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात की, ''शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' ही कालावकाशांमधील संबंधांच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. कालावकाशांमधून लिंगभाव व्यक्त करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न 'रीटा वेलणकर' मधून झाला आहे.''[२] शहरी वातावरणातील गुदमरलेल्या कामभावनांची प्रतीकांच्या रुपाने व्यक्त होणारी मानसिकता लेखिका प्रदर्शित करते.

महानगरीय उद्योगक्षेत्रात आज अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. संगणकाच्या रुपाने प्रगतीचा आलेख उंचावला पण बेरोजगारीचा प्रश्न भीषण झाला. अशा काही प्रश्नांना स्पर्श करण्याचा प्रयत्न संजीव खांडेकर यांच्या 'अशांतपर्व' (१९९२) या कादंबरीत झाला आहे. माहिती—तंत्रज्ञानाने केलेली प्रगती बाळसे मानायची की सूज हा खरा प्रश्न आहे. यंत्रयुगामुळे बेरोजगारी वाढत असेल तर अशा पर्वाला 'अशांतपर्व' का म्हणू नये? असे लेखकाला वाटणे साहजिकच आहे. संजय जोशी यांच्या 'नचिकेताचे उपाख्यान' (१९९६) या कादंबरीतील याच स्वरुपाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मोठमोठया उद्योगव्यवसायातील उच्च पदस्थ लोकांमध्ये चाललेली गळेकापू स्पर्धा, चैनी—विलासी जीवन, पैशासाठी वाट्टेल ते यांचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे. एकंदरीत आज समाजमनाला ग्रासू लागलेल्या मूल्यऱ्हासाच्या असाध्य व्याधींचे हे वाङ्मयीन आविष्कार आहेत.

मुंबईतील लेबर कॅम्प नामक झोपडपट्अीतील वास्तवदर्शी चित्र बाबुराव बागूल यांनी 'कोंडी' (२०००) या कादंबरीत रेखाटलेले आहे. पावन पगारे या तळमळीने काम करणाऱ्या दलित कार्यकर्त्यांची मुंबई महानगरात स्वार्थी राजकारणामुळे कशी कोंडी होते हे या कादंबरीत आले आहे. पावनवर जीवापाड प्रेम करणारी सुशीला सासूला म्हणते, ''अत्याई, मुंबई फार निष्ठूर आहे, यांच्यासारखी भोळी—भाबडी माणसे तिथे राहू शकत नाही. राहिली तर ती काही दिवसातच कठोर, कडवी व कोरडी होतात.'' (पृ.२८) सुशीलेच्या तोंडून बाबुराव बागूलांनी या महानगरातील भावनाशून्य जीवनाचे व निष्ठूर माणसांचे वर्णन केले आहे.

अशा प्रकारे १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीत जागतिकीकरणाचे पडसाद उमटलेले दिसतात. वरील कादंबरीकारांशिवाय श्याम मनोहर, शंकर सखाराम, विलास सारंग यांनीही महानगरीय जीवनाचे चित्रण केले आहे. मुंबई या महानगराव्यतिरिक्त भाऊ पाध्ये यांच्या 'होमसिक ब्रिगेड' चा अपवाद वगळता इतर महानगरांचे चित्रण मराठी कादंबरीत फारसे आलेलेच नाही. मुंबई हे एक महाराष्ट्रातील आव्हानात्मक शहर आहे. मुंबईतील जगण्याला अनेक पैलू आहेत. येथील मानवी जीवन अत्यंत गुंतागुंतीचे आहे. या महानगरात सुखलोलूप उच्चवर्गीय आहेत, जगण्याशी चिवटपणे झुंज देणारी सामान्य माणसे आहेत, तसेच स्वत:चे मध्यमवर्गीयपण टिकविण्यासाठी जीवाचे रान करणारी मध्यमवर्गीय माणसे आहेत आणि यांना वर्गच नाही असे बकाल, रोगट, भिकारी, झोपडपट्टीत राहणारे, फुटपाथवर आयुष्य काढणारे लोकही मुंबई या महानगरात आहेत. माणसांच्या वर्गीय जाणिवांचे हे वैचित्र्य कादंबरीकारांना आव्हानात्मक वाटले असावे. म्हणूनच मुंबई या महानगरावर इतर महानगरांच्या तुलनेने अधिकाधिक कादंबऱ्या निर्माण झाल्या असाव्या.

## निष्कर्ष :

१. नव्वदच्या दशकात जागतिकीकरणचे वारे वाहू लागले, बाजारपेठांचे अर्थकारण आणि त्यामागे असणारे राजकारण झपाटयाने प्रस्थापित झाले, त्याचा प्रभाव महानगरीय कादंबरीत पडलेला आहे.
२. आधुनिकतेच्याही पुढच्या टप्प्यावरची 'उत्तर–आधुनिकता' आता निर्माण झाली असून, महानगरीय जीवनशैलीतून त्याचा प्रत्यय मोठया प्रमाणावर येऊ लागला आहे.
३. महानगरीय जीवनात नैतिक मूल्यांची झालेली घसरण महानगरीय कादंबरीत प्रतिबिंबित झालेले दिसते.
४. ९० नंतरच्या कादंबरीला साठोत्तर कादंबरी इतके सर्वव्यापी व समग्र महानगरीय वास्तव पकडता आले नाही.
५. भाऊ पाध्ये यांच्यासारख प्रगल्भ कादंबरीकार ९० च्या नंतर महानगरीय कादंबरीला लाभला नाही.
६. १९९० नंतरची महानगरीय कादंबरी तपशीलात अडकून पडल्यामुळे तिचे आशयाकडे दुर्लक्ष झाले.
७. मुंबई महानगराचा परीघ नंतरच्या काळातही कुणाला ओलांडता आला नाही.
८. आता २००० नंतर नगरांचे महानगरांत रुपांतर होते आहे.

## संदर्भ सूची :

१. सप्रे अविनाश, 'महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य' 'साहित्य आणि समाज' सं.प्रा. नागनाथ कोत्तापल्ले प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती – १३ मे २००७, पृष्ठ २०६.
२. थोरात हरिश्चंद्र, 'गेल्या पन्नास वर्षांतील मराठी कादंबरीचा आकृतीबंध', गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, सं. विलास खोले लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : ऑगस्ट २००२, पृ. ९३.